**Author: Girish Desai**
3875 Manhassett Place, Marietta GA 30066 (USA)
Email ID: gudesai@gmail.com Tel/Whatsapp# +1 678-674-6616

# शुभंकरोती

"इथे उपवासाच्या भाजणीपासून ते बाकरवडीपर्यंत सगळं काही मिळतं. तेव्हा उगीच धावपळ करू नका." शार्दूल पोटतिडकीने सांगत होता.

"अरे पण इथल्यासारखी तिथे चव नसते. नुसती औषधं आणि कपडे घेऊन येणं पटत नाही." सरोजने मुलाला सुनावले.

"अगं आई, तुम्ही सहा सात वर्षांनी अमेरिकेला येत आहात. आता सगळं खूप बदललं आहे." शार्दूल आपला हेका सोडायला तयार नव्हता.

"अरे पण अवनीला इथली बर्फी आणि पेढे आवडते." सरोजने नातीच्या आडून बाण मारला.

"अवनी आता पंधरा वर्षांची झाली आहे. पक्की टीनएजर. इथल्या टीनएजर आपल्या तब्येती विषयी खूप जागरूक असतात. त्यामुळे तू आणलेली मिठाई तिने खाल्ली नाही कि तुला वाईट वाटेल. अवनी आता पूर्वी सारखी कुक्कुल बाळ राहिली नाही. ती आमचेही ऐकत नाही. पण अभ्यास नीट करते आणि समंजस असल्याने आम्ही लक्ष देत नाही. इथे आल्यावर तिला वळण लावायच्या फंदात पडू नकोस. तिच्या लहानपणी तू तिला लहान स्तोत्रे, आरत्या वगैरे शिकवीत होतीस. मात्र आत्ताची पिढी तंत्रज्ञानाच्या युगात वावरते. ती घरात निदान मराठी बोलते, हे सुद्धा काही कमी नाही." शार्दुलने योग्य त्या अपेक्षा बाळगण्यास आईला सांगितले.

मायलेकांचा हा प्रेमळ संवाद भास्करराव मिश्कीलपणे हसत ऐकत होते. शांत, सुस्वभावी भास्करराव, मुलाला सुनेला आणि नातीला, कधी एकदा भेटतो याचे मनोरथ रचत होते. अमेरिकेला जाण्याची चौथी वेळ असल्याने ते दोघेही तसे सरावलेले होते. त्यांना एअरपोर्टवर आणायला शार्दूल एकटाच आला होता.

"अंकीता येणार होती, पण मीच तिला घरी थांबायला सांगितले." आईच्या प्रश्नार्थक मुद्रेला शार्दुलने आधीच उत्तर दिले.

"अवनीचा अभ्यास कसा चालू आहे?" भास्कररावांनी विचारले.

"तिच्या सारख्या काही ना काही परीक्षा चालू असतात. त्यामुळे सतत वैतागलेली असते." शार्दूल उत्तरला.

गप्पांच्या नादात प्रवास झटदिशी पार पडला.

काही वेळातच गाडी टुमदार बंगल्यांच्या सोसायटीत शिरली. काही रस्ते ओलांडीत ती एका लांबलचक ड्राईव्ह-वे वर येऊन थांबली.

“हे आपलं नवीन घर. तुम्ही फोटोत, व्हिडिओ कॉलवर पाहिलंच आहे, आता प्रत्यक्षात बघा. आधीच्यापेक्षा मोठं आणि हवेशीर आहे नाही?” शार्दूल उत्साहाने बोलत होता. आपल्या मुलाच्या कर्तृत्वाचा देवधर दांपत्याला अभिमान वाटला.

घरात आल्या आल्या अंकीताने सासूसासऱ्यांना वाकून नमस्कार केला. तिने घर खूप छान सजवले होते. विविध देशातल्या वस्तू, शोभेची झाडे, नक्षीदार हंडे पाहून सरोजला सुनेचे खूप कौतुक वाटले. परंतु या सर्व वस्तुंपेक्षाही कधी एकदा नातीला भेटते असे तिला झाले होते. भास्कररावांची नजरदेखील अवनीचा शोध घेत होती. शार्दूल, अंकीताने त्यांच्या मनाची घालमेल ओळखली.

“अवनी, खाली ये बेटा. आजी आजोबा आले आहेत.” अंकीताने जोरात आवाज दिला.

“पहिल्या हाकेला ओ दिल तर शपथ. कानात काही ना काही तरी अडकवलेलं असतं.” अंकीता वैतागून बोलली.

“अगं तिला टेक्स्ट कर. मग लगेच येईल.” शार्दुलने उपाय सुचवला.

“घरातल्या घरात टेक्स्ट?” सरोजने आश्चर्याने विचारले.

तेवढ्यात सर्वांची लाडकी अवनी दार उघडून बाहेर आली. काहीशा कोरड्या आवाजात म्हटली, “हॅलो आज्जी, हॅलो आजोबा.” खाली ये असे अंकीता तिला डोळ्यांनी खुणवत होती. परंतु बाईसाहेब ढिम्मपणे वरच उभ्या होत्या. मुलीने खाली येऊन आजी आजोबांच्या पाय पडावे असे अंकीताला वाटत होते. अखेरीस शार्दुलने परिस्थिती ओळखून आई बाबांना त्यांच्या या खालच्याच मजल्यावरच्या बेडरूममध्ये नेले. आईबाबा आले तर त्यांचा जिन्याचा त्रास वाचावा यासाठी त्याने हे घर मुद्दामच निवडले होते. बॅगा एका कोपऱ्यात ठेवल्यानंतर शार्दुलने आईबाबांना बाथरूम व इतर जुजबी गोष्टी दाखवल्या. एव्हड्या लांबच्या प्रवासामुळे दोघेही थकलेले होते. काही दिवस हे जेटलॅगमध्ये जाणार होते.

“मी सांगितलेलं लक्षात आहे ना? बघितलं ना अवनी किती मोठी झाली आहे? दोन वर्षांनी कॉलेजात जाईल. तेव्हा तिला काहीही शिकवण्याच्या फंदात पडू नका. तिच्या काही गोष्टींकडे दुर्लक्ष करा.” शार्दुलने हलक्या आवाजात दोघांना सांगितले.

“तू काहीही काळजी करू नकोस.” सरोज आणि भास्करराव एकसुरात बोलले. शार्दुलने सुटकेचा निश्वास सोडला.

-------------

सरोज, भास्करराव लवकरच स्थिरावले. सकाळी फेरफटका मारणे, घराभोवतीच्या झाडांना पाणी घालणे, दुपारी वामकुक्षी वगैरे मध्ये दिवस आनंदाने सरायचा. इंटरनेटमुळे करमणुकीला तोटा नव्हता. अंकीता घरूनच पार्टटाईम तर शार्दूल निम्मे दिवस घरून काम करीत होता. अवनी शाळेतून घरी आली कि आपल्या खोलीत लगेच गायब होत असे. सर्वांचा दिनक्रम असा ठरलेला होता.

मात्र आजीची माया, किती दिवस बंदिस्त राहणार होती? मुलाला शब्द दिला तरीही सरोजचे मन स्वस्थ बसत नव्हते. तिला अवनीच्या बऱ्याच गोष्टी खटकत होत्या. तिचे रात्री उशिरा पर्यंत जागे राहणे, भारतीय खाद्यपदार्थांना नावे ठेवणे, खोलीतला पसारा, जेवतानासुद्धा एका हातात सतत मोबाईल - एक ना दोन - हजार गोष्टी सरोजला खुपत होत्या. भास्करराव, सरोज एव्हडे मनाला लावून घेत नव्हते. मात्र आपली संस्कृती आणि संस्कारांपासून नात दुरावत चालली आहे याची खंत बाळगून होते. याबाबत त्यांनी मुलाशी संवाद साधण्याचा प्रयत्न करून पाहिला. परंतु त्याने ते तितकेसे मनावर घेतले नाही. घरात लहानसे देवघर होते. अंकीता कधीतरी दिवाबत्ती, पूजा अर्चा वगैरे करायची. परंतु त्या दोघांनी लेकीवर कुठलेच बंधन घातले नव्हते. ती लहान असताना त्यांनी थोडेफार प्रयत्न केले होते. तिला एकदा तर संस्कार शिबिरात घातले होते. परंतु अल्प प्रतिसादामुळे तो कार्यक्रम बारगळला. अवनी जसजशी मोठी होत गेली तसतसे या गोष्टींपासून फारकत घेऊ लागली. 'आहे त्या देशात परिस्थितीनुसार जुळवून घेण्याच्या' पळवाटेखाली "संस्कार" या विषयाला अंकीता शार्दुलने पूर्णविराम दिला. तरीसुद्धा मनातून त्यांना, आपल्या मुलीने काही रीती रिवाज पाळावेत असे नेहमी वाटत असे.

"पप्पा, आज्जीला सांग माझ्या रूममध्ये जाऊ नकोस." अवनीने घुश्यातच तक्रार नोंदवली.

"अग तिला राहवले नाही म्हणून तिने तुझी रूम आवरली असेल." शार्दुलने आपल्या आईची बाजू मांडली.

"मला आवडतो पसारा. माझ्या वस्तूंना हात लावलेलं मला नाही आवडत." अवनी घुश्श्यातच होती.

"शार्दूल, अवनीच्या खोलीतील चित्रे तुला पाहावतात का रे? श्शी काय एक एक नमुने आहेत? मुलींना हे शोभतं का?" सरोजने मुलावर फैर झाडली.

"अगं आई, हे खूप नॉर्मल आहे. तिच्या सर्व मैत्रिणी कोरियन फिल्म्स बघतात. त्यातले हे कलाकार आहेत." शार्दुलने लेकीची बाजू घेतली.

"आता तू माझ्या तोंडाला चिकटपट्टी लावली म्हणून गप्प बसावे लागते आहे. पण निदान अंकीताने तरी आपल्या मुलीकडे थोडेफार लक्ष नको का द्यायला?" सरोजने बरेच दिवस कोंडलेली वाफ मोकळी केली.

आजी आणि नातीमध्ये शीतयुद्ध सुरु झाले. लहानपणी, रात्री शेजारी झोपायचा हट्ट करणारी, बोबडी गाणी म्हणणारी हिच का ती अवनी असा सरोजला प्रश्न पडू लागला. परंतु काबुलीवाल्याच्या गोष्टीप्रमाणे तिही नातीला बालपणीच्याच कपड्यात गुंडाळू पाहत होती.

“पप्पा, मागच्या सारखा आजी आजोबांचा स्टे वाढवू नकोस.” अनाहूतपणे भास्कररावांनी जेव्हा हे वाक्य अवनीच्या तोंडून ऐकले तेव्हा त्यांना धक्काच बसला होता. ‘आजी आजोबांना अजून राहा’ म्हणून गेल्या खेपेला तिने टाहो फोडला होता.

-------------

“असा चेहरा पाडून का बसलास? काय झालं?” सरोजने शार्दुलला विचारले. बॅकयार्डमध्ये शार्दूल एकटाच चिंताग्रस्त बसलेला होता. त्याला असे बसलेले याआधी कुणी पाहिले नव्हते. या वेळेस तो एकतर टेनिस खेळायला जातो किंवा जिममध्ये. त्यातून आज शुक्रवार. ऑफिस संपलेले. शार्दूलकडून उत्तर आले नाही. सरोज चक्रावली. तिने परत विचारपूस केली.

“अवनीला शाळेत चक्कर येऊन पडली. शिवाय तिला ताप आहे. अंकीताला शाळेतून फोन आला. ती अवनीला घेऊन येईलच एव्हढ्यात.” शार्दुलने अखेरीस आईला परिस्थितीची कल्पना दिली.

“बाप रे. आम्हाला का नाही सांगितलंस?” सरोजच्या पायाखालची जमिनीच हलली.

“तुम्हाला कशाला टेन्शन द्यायचं, म्हणून मुद्दाम बोललो नाही.” शार्दूल.

“अरे पण डॉक्टरकडे जायचं नां.” सरोज त्याला आधार देत म्हणाली.

“तेच तर टेन्शन आहे गं. शुक्रवारी ४ नंतर डॉक्टरचं क्लिनिक बंद होते. ते सोमवारी उघडणार आहे. हॉस्पिटलमध्ये चार चार तास थांबावे लागणार आहे. शिवाय एक मोठी समस्या उद्भवली आहे. आमच्या कंपनीने नुकताच इन्शुरन्स बदलला आहे. माझे नाव त्यांच्या यादीतून गहाळ झाले आहे. त्यांची चूक निस्तरायला सोमवार उजाडणार आहे.” शार्दूल हतबलपणे बोलत होता.

त्या दोघांच्या मागे उभे राहून भास्करराव शांतपणे सारे काही ऐकत होते. कधी कधी नवीन तंत्रज्ञानाचा असाही त्रास होऊ शकतो हे देवधर कुटुंबाला जाणवले. तेव्हड्यात गाडीचा आवाज आला. अंकीताने अवनीला हळूहळू आधार देत घरात आणले. तिची अवस्था बघून साऱ्यांची मने हेलावली. हसती बागडती मुलगी, पूर्णतः कोमेजून गेलेली होती. तिच्यात अजिबात त्राण उरलेले नव्हते. तिला जिन्यावरून जाणे कठीण झाले असते. म्हणून मग तिला खालीच आजी आजोबांच्या खोलीत ठेवायचे ठरले. सरोजने तात्काळ परिस्थितीचा ताबा घेतला. कारण अंकीता बाहेर जाऊन हमसाहमशी रडू लागली. तिचे सांत्वन करायला शार्दूल गेला. अवनी अर्धवट उघड्या डोळ्यांनी सारे पाहत होती. सर्वांना आता हा किल्ला सोमवारपर्यंत कसाबसा लढवायचा होता. परिस्थितीमुळे आपण किती हतबल होतो हे शार्दूल अंकीताला जाणवत होते. त्यांच्यापेक्षा अधिक पावसाळे पाहिलेल्या आणि सोसलेल्या भास्कररावांनी आणि सरोजने कंबर कसली. त्यांनी शार्दूल अंकीताला धीर दिला.

“काळजी करू नका. आम्ही आहोत. ईश्वरावर भरोसा ठेवा. अरे तू पण एकदा असाच आजारी पडला होतास. सारे ठीक होईल.” या त्यांच्या वाक्यामुळे वातावरण थोडे निवळले.

अवनीच्या उशा पायथ्याशी सरोज रात्रभर बसून होती. तिला जुजबी औषध दिले परंतु त्याचा पुरेसा परिणाम झाला नाही. सरोजने अवनीच्या डोक्यावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवल्या.

भास्कररावांनी त्यांच्याकडील काही आयुर्वेदिक उपाय केले. पहाटे पहाटे अवनीला शांत झोप लागली. भास्करराव खुर्चीतच झोपलेले होते. सरोज अवनीचा हात हातात घेऊन पडून राहिली होती.

शनिवारचा दिवस अशाच पद्धतीने उपाय करण्यात गेला. भास्कररावांनी खोलीत बसून लहानशी पोथी वाचली. आजीबाईंनी त्यांचा बटवा उघडला होता. अवनीला तांदळाची पेज, खीर वगैरे हळूहळू खायला घातले. अवनी हे सारे उघड्या डोळ्यांनी बघत होती. शार्दूल फोन वरून इन्शुरन्सची चूक सुधारण्याचा प्रयत्न करीत होता. अंकीता सर्वांच्या खाण्यापिण्याचे बघत होती. दुपारी तिने सक्तीने सासू सासऱ्यांना विश्रांती घ्यायला भाग पाडून एकटीने किल्ला लढवला. त्या रात्री सरोज पुनः अवनीच्या उशाशी बसून राहिली. अवनीची प्रकृती हळूहळू स्थिर होऊ लागली. रविवारी तिचा ताप पूर्णपणे उतरला. ती आता पुष्कळच ताजीतवानी दिसू लागली. अखेरीस ती काळरात्र सरली. सोमवार उजाडला. सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला. डॉक्टरांची पहिली अपॉइंटमेंट मिळाली. दरम्यान शार्दुलने इन्शुरन्सची गाडी रुळावर आणली. वीकएंडच्या काळात अवनीवर केलेल्या उपायांची डॉक्टरांनी मुक्त कंठाने प्रशंसा केली. अवनीला पुढील दोन दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले. तिच्या सर्व तपासण्या नॉर्मल निघाल्या. शाळेतील मैत्रिणीच्या बर्थडे पार्टीमध्ये काहीतरी वावगं खाण्यात आल्यामुळे अवनीला ऍलर्जीचा त्रास झाला होता. हे निदान ऐकून देवधर कुटुंबीयांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

-------------

या गडबडीत प्रयाणाची तारीख कधी जवळ आली हे कुणाला समजलेच नाही. दिवस भुर्रकन उडून गेल्याचे सर्वांना जाणवले मात्र खरे. आपल्या माणसांना सोडून जाण्याच्या कल्पनेने सरोज आणि भास्कररावांचे मन भरून आले. परंतु हा दिवस कधी ना कधी तरी येणारच होता. आपण दिवस जेव्हडे मुठीत धरून ठेवायचा प्रयत्न करतो तेव्हडेच ते समुद्रातील रेतीप्रमाणे निसटून जातात नाही कां? शार्दूल, अंकीताने आई बाबांच्या बॅगा अनेक उपयोगी, शिवाय इतरांना भेट देण्यासाठीच्या वस्तूंनी खचाखच भरल्या. बॅगांची वजने केली. प्रयाणाच्या आदल्या रात्री सरोज आणि भास्कररावांनी आपल्या या वेळच्या मुक्कामाची उजळणी केली. अवनीवरील गंडांतर टळले याबद्दल त्या दोघांनी ईश्वराचे आभार मानले.

“रात्री १० चे फ्लाईट आहे. ७ वाजता तिथे पोहोचावे लागेल. तेव्हा आपण ६ वाजता घरातून निघू.”. शार्दुलने आईबाबांना वेळापत्रक सांगितले. सकाळपासून अवनी गप्प गप्प होती. आजारपणानंतर तिचा अवखळपणा काहीसा कमी झालेला होता. तिची खोली पूर्वीपेक्षा नीटनेटकी दिसत होती. दुपारचे जेवण, सर्वांनी एकत्र बसून केले. आश्चर्य म्हणजे त्यावेळेस अवनीजवळ तिचा सेलफोन नव्हता. मात्र ती गप्प होती. सरोज तिला डोळे भरून नजरेत साठवीत होती. निरोपाच्या दिवशी घड्याळाचे काटे कसे पटापट फिरतात नाही?

दाराबाहेर गाडी तयारच होती. निघायला अजून अर्धा पाऊण तास होता. सरोज, भास्कररावांचा पाय निघत नव्हता. परंतु उगवणारा सूर्य आणि मावळणारा चंद्र कधी थांबतो का? अगदी

त्याचप्रमाणे जीवनाचे रहाटगाडगे चालूच ठेवावे लागते नाही कां? अंकीतालाही भरून आले होते. काही वेळापूर्वी सरोजने देवघरात दिवाबत्ती केली होती. बाहेरच्या खोलीत सर्वजण बसून होते. अवनीचा कुठेही मागमूस दिसत नव्हता. सरोजची व्याकुळ नजर तिचा वेध घेत भिरभिरत होती. अवनी कुठे आहे हे विचारताच शार्दूल अंकीताने माहित नाही असा अविर्भाव केला. मग सरोजला राहवले नाही. ती तडक वरच्या मजल्यावर गेली. सर्व खोल्या, बाथरूम पालथ्या घातल्या. अवनीचा पत्ता नव्हता. मग ती परत खाली आली. गॅरेज बघितले. तिच्या मागे भास्करराव, शार्दूल, अंकीता अवनीला शोधू लागले. एक शेवटचा प्रयत्न म्हणून सरोजने देवघरात डोकावले. आणि बघते तर काय. तिथे अवनी शांतपणे डोळे मिटून, मनोभावे हात जोडून उभी होती. तिच्या मुखातून "शुभंकरोती कल्याणम आरोग्य धनसंपदा ....." हे शब्द अलगदपणे बाहेर पडत होते.

काहीवेळापूर्वी लावलेले निरांजन अजूनही तेवत होते. उदबत्तीचा मंद सुवास सर्वत्र दरवळत होता. त्या मंद प्रकाशात अवनीचा चेहरा उजळून निघत होता.

देवघराच्या दारात चौघेही एकमेकांकडे बघत थिजून उभे राहिले. नकळतपणे त्यांनीही हात जोडले. मुख्य दारातल्या बॅगा गाडीत जाण्यासाठी सज्ज होत्या. मात्र या क्षणापुढे काळ सुद्धा थांबला होता आणि आसमंत निःशब्द झाला होता.

* * * * **पूर्णविराम** * * * *

**गिरीश देसाई**

---

कथालेखन स्पर्धा

Girish Desai

3875 Manhassett Place, Marietta GA 30066 (USA)

gudesai@gmail.com Whatsapp# +1 678-674-6616